वैद्यकीय व्यवसायातील अनैतिकता कोणत्या? वैद्यकाची आचार संहितेचे स्वरूप स्पष्ट करा. (१)

मानवी जीवनात शिक्षण व्यवसाया एवढीच महत्वाची भूमिका बजावणारा वैद्यकीय व्यवसाय आहे. किंबहुना इतर कोणत्याही व्यवसायापेक्षा या व्यवसायाचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. व्यक्तीच्या तसेच समाजाच्या आरोग्याचे संवर्धन किंवा रक्षण करणे हेच या व्यवसायाचे मूलभूत ध्येय आहे. मानवी जीवनातील दुःख नाहीसे करून जीवनाची लांबी वाढवण्याचे कार्य वैद्यक करत असतो. म्हणून त्यास पृथ्वीतलावरील ईश्वर असेही म्हटले जाते. कोणत्याही समाजाचे किंवा देशाचे भवितव्य त्या देशातील नागरिकांच्या आरोग्यावरच अवलंबून असते. या आरोग्याची काळजी घेण्याचे कार्य वैद्यक करत असतो. माणसाचे केवळ मन नैतिक असून चालत नाही. तर त्याला निरोगी कणखर शरीराची जोड असणे तेवढेच गरजेचे असते. या कार्यात वैद्यकाची भूमिका महत्वाची ठरते. अशा अनेक कारणांनी या व्यवसायाकडून समाजाच्या फार मोठ्या नैतिक अपेक्षा असतात. या व्यवसायात कार्य करणाऱ्या व्यक्तींनी उच्च प्रतीची नैतिकता बाळगली पाहिजे अशी समाजाची अपेक्षा असते.

बदलत्या काळानुसार आणि वेगाने बदलणाऱ्या समाजजीवनानुसार या क्षेत्रातही अमुलाग्र असे बदल घडून आले. अर्थात या क्षेत्रातील ज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती ही जशी वरदान ठरली तशी ती या क्षेत्रातील अनैतिकता व समस्या वाढवणारी देखील ठरली. त्यापैकी काही प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतात.

(१) <u>सांघिक चिकित्सा पद्धतीचा दुरुपयोग</u> – आधुनिक काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मोठ्या प्रमाणावर प्रगती केली. याचा स्वाभाविक परिणाम वैद्यकीय क्षेत्रावर झाला. नवनवीन उपचार पद्धती, आधुनिक औषधी, चिकित्सेसाठी वापरली जाणारी साधने यात अमूलाग्र परिवर्तन घडून आले. याचाच एक भाग म्हणून सांघिक चिकित्सा पद्धती उदयास आली. या पद्धतीत एकाच रुग्णाला निरनिराळे तज्ञ तपासून ~~एक~~ अहवाल तयार करतात. ते सर्व अहवाल एकत्रित करून रुग्णाच्या आजाराचे निश्चित निदान करून त्यावर अचूक उपचार केले जातात. ही चिकित्सा पद्धती आपल्याला लाभलेले वरदानच आहे असे म्हटले तरी ते वावगे ठरत नाही. परंतु दुर्दैवाने अलिकडील काळात वैद्यकांचा कल पैसे उकळण्याकडे झाल्याने, ते विनाकारण रुग्णाला निरनिराळ्या चाचण्या करावयास भाग पाडतात. या प्रकारात मुख्य वैद्यक इतर तज्ञ, वैद्यकीय प्रयोगशाळा, औषधी दुकान यांची व्यवस्थित साखळी तयार होते. या साखळीच्या माध्यमातून रुग्णांची बेमालूमपणे लूट केली जाते.

(२) <u>पिशाच्च (राक्षसी) शल्यचिकित्सा</u> – वर्तमानकाळात शल्यचिकित्सेचा हा प्रकार सर्वसामान्य झालेला दिसून येतो. पिशाच्च किंवा राक्षस ज्या प्रकारे मानवी जीवाशी खेळत असतात. काहीसा तसाच प्रकार वैद्यक ही रुग्णांच्या संदर्भात करताना दिसून येतात. एखादा रुग्ण नामांकित वैद्याकडे शस्त्रक्रियेसाठी गेला तर तो वैद्यक ती शस्त्रक्रिया स्वतः न करता

आपल्या हाताखाली शिकणाऱ्या नवशिक्या वैद्यकाकडून करवून घेतो. जे की अत्यंत चुकीचे आहे. याशिवाय आवश्यकता नसताना शस्त्रक्रिया करायला लावणे, चुकिच्या ठिकाणी शस्त्रक्रिया करणे किंवा चुकिच्या तसेच कालबाह्य झालेल्या पद्धतीने शस्त्रक्रिया करणे, रुग्णांच्या नकळत पुनर्रोपण करता येणारे अवयव काढून घेणे असे कितीतरी गैरप्रकार घडताना दिसून येतात. हा रुग्णांच्या जिवाशी खेळण्याचाच प्रकार आहे.

(3) आर्थिक गैरव्यवहार: कोणताही व्यवसाय हा अर्थार्जनासाठीच केला जातो. तरीपण अर्थार्जन हा व्यवसायाचा दुय्यम हेतू आहे. मानवतेची सेवा करणे हा प्राथमिक हेतू आहे. परंतु आजच्या युगात केवळ 'पैसा' हे मानवी मूल्य बनले आहे. त्यामुळे माणूस नैतिकते ऐवजी भौतिकतेच्या मागे लागला त्याचा परिणाम वैद्यकीय व्यवसायावरही झाले. अतिरिक्त स्वरूपाच्या द्रव्यलालसे पोटी. अनेक आर्थिक गैरव्यवहार निर्माण झाले. आवश्यकते पेक्षा अधिक शुल्क आकारणी, विनाकारण आजार गंभीर भासवून उपचार करणे, आवश्यकता नसताना वैद्यकीय चाचण्या करावयास भाग पाडणे, श्रीमंत रुग्णांकडे अधिक लक्ष देणे, अवयवांचा चोरटा व्यापार करणे, दलालांच्या माध्यमातून रुग्ण शोधणे, जाहिरातबाजी करणे असे कितीतरी गैरप्रकार आज वैद्यकीय व्यवसायात निर्माण झालेले दिसून येतात.

(4) वैद्यकांचे विषम भौगोलिक वितरण - व्यावसायिक सेवा देणाऱ्यांचे एकुण लोकसंख्येशी असणारे प्रमाण पुरेसे असणे आणि त्यांचे समान भौगोलिक वितरण होणे ही आवश्यक बाब आहे. इतर व्यवसायां प्रमाणे वैद्यकांचे प्रमाणदेखील लोकसंख्येच्या प्रमाणात असले पाहिजे. भारतीय संदर्भात लोकसंख्येच्या तुलनेत वैद्यकांची संख्या अतिरिक्त स्वरूपाची आहे. तरीपण त्यांचे योग्य भौगोलिक वितरण झाले तर समस्या निर्माण होणार नाहीत. परंतु भारत हा जरी 80% ग्रामीण व 20% शहरी असला तरी जवळपास 85% वैद्यक शहरी भागातच आपला व्यवसाय करतात. वास्तविक 80% वैद्यक ग्रामीण भागात असले पाहिजेत. शासनाने निर्बंध घातले असले तरी त्यात पळवाटा शोधून शहरातच व्यवसाय करणाऱ्या वैद्यकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे समाजातील एक मोठा वर्ग या आरोग्यसुविधेपासून वंचित राहतो. (10)

वर प्रतिपादन केलेल्या समस्या किंवा अनैतिकता या प्रातिनिधिक स्वरूपाच्या आहेत. अजूनही काही समस्या सांगता येऊ शकतात. या समस्यांचे निराकरण करणे आजच्या काळाची गरज आहे.

* वैद्यकाची आचारसंहिता - कोणत्याही व्यवसायात प्रवेश केल्यानंतर त्या व्यवसायिकासाठी एक निर्धारित आचारसंहिता सांगितलेली असते. वैद्यकीय व्यवसायात प्रवेश करताना हिप्पोक्रेटसने सांगितलेली शपथ प्रत्येकाने घेतली पाहिजे असा दंडक आहे. ही शपथ म्हणजेच आजच्या वैद्यकीय संहितेचे प्राथमिक स्वरूप आहे. डॉ. थॉमस पार्सिवल यांनी आपल्या वैद्यक मुलाला लिहिलेल्या पत्रात काही सूचना केल्या होत्या. त्या सूचनाच थोड्याफार फरकाने वैद्यकीय संहिता म्हणून स्वीकारल्या गेल्या. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येते.

(1) मानवी जीवनातील दुःख नाहीसे करणे व मानवी जीवनाचे संवर्धन करणे यासाठी वैद्यकाने झटले पाहिजे.

(2) कोणत्याही प्रकारच्या आर्थिक गैरव्यवहारापासून अलिप्त राहिले पाहिजे.

(3) वैद्यकाने स्वतःच्या मालकीच्या शस्त्रक्रियेची साधने, उपचारपद्धती, औषधे, संशोधन यांचे हक्क बाळगणे गैर नाही. परंतु त्याचा वापर केवळ स्वार्थासाठी करू नये.

(4) कोणत्याही गैरव्यवहार करणाऱ्या, अकुशल, अप्रामाणिक व्यक्तींशी संबंध ठेवता कामा नये.

(5) स्वतःच्या ज्ञानाविषयी किंवा उपचार पद्धतीविषयी दुराग्रही असू नये.

(6) रुग्णाने आपल्यावर टाकलेला विश्वास जपला पाहिजे.

(7) कोणतेही अतिरेकी स्वरूपाचे निदान करू नये.

(8) आपल्या व्यवसायाची व समव्यावसायिकांची प्रतिष्ठा जोपासली जाईल असेच वर्तन ठेवले पाहिजे.

(9) सेवाभावी संस्थांकडून रुग्णांना मिळणारी मदत त्यांना मिळावी यासाठी आवश्यक ते सहकार्य करावे.

(10) नवनवीन ज्ञान देणाऱ्या मान्यताप्राप्त आरोग्य शिक्षणाच्या योजनेत सहभागी होऊन ज्ञान वृद्धिंगत करावे.

(11) सामाजिक आरोग्य अबाधित रहावे यासाठी शासन व समाजाला योग्य तो सल्ला वेळोवेळी दिला पाहिजे.

प्रत्येक वैद्यकाने या व अशा मार्गदर्शक तत्त्वांचा अंगीकार करून वर्तन केले तर वैद्यकीय व्यवसायातील बऱ्याच समस्या दूर होण्यास मदत होऊ शकेल.